# यंदाच्या 'वुरी रँकिंग'मध्ये विश्वकर्मा विद्यापीठ अव्वल

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

'विश्वकर्मा विद्यापीठा'ने 'वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंग फॉर इनोव्हेशन २०२४'मध्ये (वुरी) उल्लेखनीय कामगिरी करून सामाजिक उत्तरदायित्व या श्रेणीमध्ये ११वा क्रमांक मिळवून देशात अव्वल स्थान आणि उद्योजकता श्रेणीमध्ये ४५वे स्थान पटकावले आहे. 'वुरी रँकिंग'मधील सामाजिक उत्तरदायित्व श्रेणीमध्ये शैक्षणिक ज्ञान आणि कौशल्यांच्या पलीकडे जाऊन नैतिकता, प्रामाणिकतेवर आधारित संशोधनावर भर दिला जातो.

या श्रेणीमध्ये विद्यापीठाच्या 'विश्वकर्मा युनिव्हर्सिटी सेंटर फॉर कम्युनिकेशन फॉर डेव्हलपमेंट' (व्हीयुसीसीडी), 'सह्याद्री फार्म्स संवाद प्रकल्प', 'न्यायिक मदत केंद्र' आणि 'महाराष्ट्र अध्यापक क्षमता विकास कार्यक्रमां'चा समावेश आहे. विद्यापीठाचे अध्यक्ष भरत अगरवाल म्हणाले, 'आम्ही सातत्याने विद्यापीठाच्या शैक्षणिक आणि संशोधन दृष्टिकोनासाठी संसाधने आणि पाठबळ दिले आहे. शिक्षण, संशोधन आणि समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून समाजामध्ये सकारात्मक बदल घडवणे हे आमचे दीर्घकालीन उद्दिष्ट आहे.'

'आम्ही विविध उपक्रमांद्वारे गंभीर समस्यांवर तोडगा काढण्यासाठी समाजातील नागरिकांसोबत संवाद साधला. सर्वसमावेशक दृष्टिकोनाचा स्वीकार करून समाजाच्या सर्व पातळ्यांवर सकारात्मक बदल घडवून आणणे आणि त्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावणे हे आमचे ध्येय आहे,' असे विद्यापीठाचे उपाध्यक्ष डॉ. वासुदेव गाडे म्हणाले.

'या माध्यमातून आम्ही विद्यापीठ स्तरावर प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देतो. त्याचप्रमाणे समाजातील समस्यांवर उपाय शोधण्यासाठी कायम प्रयत्नशील असतो,' असे कुलगुरू डॉ. सिद्धार्थ जबडे म्हणाले.